# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : १२/०८/२०२४

# प्रेसनोट

दि.०९ ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले असून "घरोघरी तिरंगा" या अभियानांतर्गत आज दि. १२/०८/२०२४ रोजी महिला बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले.सदर रॅली माजी नगरसेविका, तसेच महाविदयालयाच्या व शाळेच्या प्राध्यापिका/शिक्षिका महापालिका अधिकारी /कर्मचारी, एनजीओ या सर्वांच्या संयुक्त विदयमाने आयोजित करण्यात आली.

सदर रॅलीच्या अनुषंगाने प्रत्येक नागरिकाच्या मनात देशभक्तीविषयी भावना जागृत व्हावी व प्रत्येकाने आपल्या घरावर १३ ते १५ ऑगस्ट या दरम्यान प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर तिरंगा लावावा असा उदेद्श होता.

सदर रॅलीमध्ये मा. माजी महापौर मिना आयलानी, रेखा ठाकूर यांच्या महाविदयालयाच्या व शाळेच्या प्राध्यापिका/शिक्षिका, एनजीओच्या ज्योती तायडे, माजी नगरसेवक मनोज लासी यांच्या पत्नी कविता सयानी ,माजी नगरसेवक महेश सुखरामानी,तृतीयपंथीय यांच्या तर्फे सपना व त्यांचे सहकारी तसेच सर्व पत्रकार बंधु भगिनी उपस्थित होते.

महापालिकेमार्फत "घरोघरी तिरंगा" समितीमधील उपसमिती प्रमुख तथा महापालिका सचिव प्राजक्ता कुलकर्णी, नोडल अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी छाया डांगळे, सिस्टम ॲनलिस्ट तथा सदस्य श्रध्दा बावीस्कर, व सदस्य तथा शिक्षण विभागाच्या उप-लेखा अधिकारी निलम कदम, सुरक्षा विभागाचे अधिकारी, कर्मचारी, उदयान विभाग प्रमुख दिप्ती पवार,पर्यावरण विभागाच्या विशाखा सावंत,अग्निशमन विभागाचे अधिकारी/कर्मचारी इ. उपस्थित होते.

सदर रॅली महापालिका मुख्यालयापासून १७ सेक्शन, १७ सेक्शन ते शिवाजी चौक, शिवाजी चौक ते नेहरु चौक, नेहरु चौक ते श्री चौक, श्री चौक ते गोल मैदान आणि परत महापालिका मुख्यालय अशा प्रकार आखणी करण्यात आली होती. रॅलीची सुरुवात मा. प्रशासक तथा आयुक्त यांनी हिरवा झेंडा दाखवून केली.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.